**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.नागनाथ आण्णा कांबळे
काकडे पार्क, बी.एल. व रुम नं.१, एल/२/१,
तानाजीनगर, चिंचवडगाव, पुणे-३३ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त(प्रशासन),
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३९० २३९१ २३९२ २३९३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नागनाथ आण्णा कांबळे
काकडे पार्क, बी.एल. व रुम नं.१, एल/२/१,
तानाजीनगर, चिंचवडगाव, पुणे-३३

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त(प्रशासन),
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी श्री.सुधाकर विष्णू विष्णू

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी श्री.बाळू गेनू पवार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.३.२००८,१३.३.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.४.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.६.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर वायरलेस ऑपरेटर, रेडिओ मेकॅनिक, वायरलेस इनचार्ज पदांना निर्माण करताना शासनाने ज्या आदेशाद्वारे सदर पदांना मंजुरी दिली त्याची प्रत, सदर पदे निर्माण करण्यासंबंधी झालेल्या संपूर्ण पत्रव्यवहाराची, संपूर्ण नसतीची सत्यप्रत, पदांना शैक्षणिक अर्हता, भरती व पदोन्नतीचे प्रारुप नियम तयार केले आहेत, प्रारुप नियमावलीच्या सत्यप्रती साक्षांकित, स्टाफिंग पॅटर्नच्या संपूर्ण कागदपत्राच्या सत्यप्रती. | |

## विवेचन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वायरलेस ऑपरेटर, वायरलेस मेकॅनिक इ.पदांच्या अनुषंगाने चार विविध अर्जांद्वारे माहिती अपीलकर्ता श्री.नागनाथ आण्णा कांबळे यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्याकडे मागितली होती. माहिती अपूर्ण असल्याच्या कारणावरुन श्री.कांबळे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त(प्रशासन), पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्याकडे अपील केले. मूळ नस्त्या त्यांना पाहणीसाठी उपलब्ध करुन देऊन दिलेल्या माहितीव्यतिरिक्तची कागदपत्रे आवश्यक असल्यास योग्य ते शुल्क आकारुन द्यावीत, असा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (प्रशासन), पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी दिला. तसेच श्री.कांबळे यांनी मूळ अर्जात मोघम स्वरुपाची व नेमका अर्थ स्पष्ट न होणारी अशी माहितीची मागणी केली आहे. नेमक्या तपशिलासह त्यांनी माहिती मागितली असती तर ती देणे जन माहिती अधिकाऱ्यांना सुलभ झाले असते. तसेच अपील अर्जासोबत मूळ अर्जाव्यतिरिक्तची माहिती पुरवणी मागणीद्वारे

मागितली आहे. हे योग्य नाही. त्यासाठी त्यांनी स्वतंत्र अर्ज देणे आवश्यक होते, असे अपिलीय प्राधिकारी श्री.सुधाकर देशमुख यांनी सर्व अपिलांच्या निकालपत्रात नमूद केले आहे.

दि.२९.१.२००९ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त उभय घटकांत एकमत झाले नाही, त्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

श्री.कांबळे हे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये रेडिओ मेकॅनिक असून माहिती मागणीचा कालावधी स्पष्ट न करता विस्तृत स्वरुपाची माहिती त्यांनी मागितली आहे. पदनिर्मिती कशी झाली, त्याबाबतचा शासन निर्णय, केलेली कारवाई याची माहिती आपल्याला दिली नाही, असे श्री.कांबळे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. मात्र श्री.कांबळे यांची माहितीची मागणी सुस्पष्ट नसल्यामुळे उपलब्ध माहिती विहित मुदतीत देण्यात आली. प्रथम अपिलाच्या वेळी त्यांनी पुरवणी मागणीद्वारे अधिक तपशिलवार माहिती मागितली. अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानुसार नस्ती पाहण्यासाठी उपलब्ध करुन देऊन त्यांना हवी असलेली अन्य माहितीही उपलब्ध करुन दिली, असे जन माहिती अधिकारी श्री.बाळू गेनू पवार यांनी नमूद केले. श्री.कांबळे यांच्या चारही अर्जांबाबतची माहिती देण्यात आली आहे, तसेच संबंधित नस्त्याही त्यांना पाहणीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. तरीही आपले समाधान झाले नसल्याचे सांगून ते सातत्याने अर्ज करीत असतात. आतापर्यंत तयांनी ३० अर्ज केलेले आहेत. महानगरपालिका स्तरावर पूर्वी पदनिर्मिती होत होती, आता होत नाही. साधारणत: ८००० आस्थापना असून यातील संबंधित प्रत्येक विभागात शोध घेऊन माहिती देण्यात आलेली आहे. अजूनही त्यांना पाहणीसाठी पाहिजे त्या नस्ती उपलब्ध करुन देता येतील, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी श्री.सुधाकर देशमुख यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता श्री.कांबळे यांना विहित मुदतीत मूळ अर्जानुसार माहिती देण्यात आली आहे. प्रथम अपिलाच्या वेळी पुरवणी मागणीद्वारे त्यांनी मागितलेली अतिरिक्त माहितीही देण्यात आली आहे. आवश्यक त्या सर्व नस्ती पाहण्यासाठी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी उपलब्ध करुन दिल्या असून त्यातील पाहिजे ती माहिती देण्याची तयारी दर्शविलेली आहे. हे लक्षात घेता जन माहिती अधिकारी व अपिलीय

प्राधिकारी यांनी योग्य कार्यवाही केली आहे. मूळ अर्जापेक्षा वेगळी मागणी व मूळ अर्जाला दिलेल्या उत्तरातून नवे मुद्दे निर्माण करुन अपिलाच्या वेळी त्याबाबत आणखी माहितीची मागणी करणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील विहित प्रक्रियेनुसार योग्य नाही. याबाबत अपीलकर्त्यास समज देण्यात येत आहे.

उभय बाजूंनी निवेदने व सादर केलेली कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे:

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१८.९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. शामसुंदर यशवंत मोरे
५३४ब, नारायण पेठ, पांडुरंग निवास,
पहिला मजला, ब्लॉक-५, पुणे-३० अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
भूमि अभिलेख, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक
भूमि अभिलेख, सासवड, ता.पुरंदर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १९.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. शामसुंदर यशवंत मोरे
५३४ब, नारायण पेठ, पांडुरंग निवास,
पहिला मजला, ब्लॉक-५, पुणे-३०

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, पुणे
श्री. बाळासाहेब वा. वानखेडे

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख,
सासवड, ता.पुरंदर, जि. पुणे श्री. काशिनाथ मोरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१.७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.८.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २.९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.९.२००८ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सोबत प्रत छायांकित प्रत जोडली आहे.

## विवेचन

सन १९८५ मध्ये झालेल्या मोजणी व फाळणी प्रकरणातील सर्व कागदपत्रांच्या प्रती आपल्याला मिळालेल्या नाहीत. फाळणीबारा रद्द करण्याबाबत आपण केलेल्या अर्जावर नोटिसा काढून कोणाचेही जाबजबाब घेतले नाहीत व प्रकरण आढळ होत नसल्याने नकला पुरविता येत नाही, असे आपल्याला कळविले. तालुका निरीक्षक भूमि अभिलेख ,पुरंदर यांनी अभिलेखात सखोल शोध घेऊन अभिलेख प्राप्त करुन घ्यावेत, असा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, पुणे यांनी देऊनही आपल्याला वीस पैकी फक्त तीन कागदपत्रे मिळाली. हे कायम स्वरुपी जतन करण्याचे अभिलेख असून जाबजबाबाच्या नकला वगैरे मिळणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.श्यामसुंदर यशवंत मोरे यांनी केले.

फाळणीबाराचा हा विषय असून दि.१४.१२.१९८५ ला मोजणी झाली, त्याच्या जाबजबाबाच्या नकला जिल्हा भूमि अधीक्षक, पुणे यांच्याही कार्यालयातही त्या आढळ होत नसल्याचे तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, हवेली, यांनी दि.६.१२.१९९९ च्या पत्रान्वये पूर्वीच कळविलेले आहे. त्यामुळे नकला देता येत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी यांनी केले.

श्रीमती शुभांगी श्यामसुंदर मोरे यांनी दिलेल्या तक्रार अर्जानुसार निर्णय व फाळणी रद्द केली. अभिलेख शोध घेण्याचा आदेश देण्यात आला होता, परंतु कार्यालय स्थलांतरित झाल्यामुळे

अभिलेख उपलब्ध झाले नाहीत. फाळणी बद्दलचा वाद असून अपीलकर्ता यांनी पुन्हा मोजणी अर्ज देऊन किंवा जमाबंदी आयुक्तांकडे अर्ज करून दाद मागता येऊ शकते, तशी कल्पना श्री. मोरे यांना देण्यात आली आहे. अनुषंगिक कागदपत्रांचा जतनाचा कालावधी पाच वर्षांचाच आहे, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख श्री. बाळासाहेब वा. वानखेडे यांनी केले.

फाळणी रद्द करण्याबाबतच्या प्रशासकीय कार्यवाहीची अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. अभिलेखाच्या जतनाचा कालावधी तपासून त्यानुसार नाश केलेल्या कागदपत्रां व्यतिरिक्तची सर्व माहिती अपीलकर्त्यास दिली गेली पाहिजे.

उभय बाजूंनी दाखल केलेली कागदपत्रे विचारात घेता, आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. उपरोक्त विषयातील अभिलेखाच्या जतनाचा कालावधी स्पष्ट करुन माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, पुणे यांनी आयोगाला दि. १५.१०.२००९ पर्यंत सादर करावा.

**( विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० .९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रामदास बाबुराव लांघी
जेजुरी नगरपरिषद, घर नं.१६३५, गडावर,
खंडोबा मंदिराशेजारी, श्री क्षेत्र जेजुरी, ता.पुरंदर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक,
पुणे जिल्हा ग्रामीण पोलीस मुख्यालय, पाषाण, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
भोर उपविभागीय कार्यालय, सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४९० / पुणे /२००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक,
पुणे जिल्हा ग्रामीण पोलीस मुख्यालय, पाषाण, पुणे श्री.अशोक मोराळे

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
भोर उपविभागीय कार्यालय, सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे श्री.रविंद्रसिंह परदेशी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.२.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.३.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.३.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>श्री मार्तंड देवस्थानचे लेटरहेडवर जेजुरी पोलीस स्टेशनला दाखल झालेल्या तक्रारीची नक्कल, कर्मचाऱ्यांकडून(साक्षीदार) पोलीस स्टेशनने घेतलेले जबाब, नकला, वस्तुस्थितीचा पंचनामा, आरोंपीवर ठेवलेले आरोपपत्र यांच्या नकला. | |

## विवेचन

जेजुरी पोलीस ठाण्यामध्ये श्री मार्तंड देव संस्थानच्या लेटरहेडवर आपल्याविरुध्द केलेल्या तक्रारीचया संदर्भातील कागदपत्रांच्या नकला अपीलकर्ता श्री.रामदास बाबुराव लांघी यांनी मागितल्या होत्या. आपण केलेल्या दि.२५.३.२००८च्या अर्जाची दखल घेतली नाही, म्हणून दि.१०.६.२००८ रोजी आपण माहितीच्या अधिकाराखाली मागणी केली. परंतु त्यानुसार माहिती मिळाली नाही व आपल्याविरुध्दची चॅप्टर केस रद्द केली गेली नाही, म्हणून श्री.लांघी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.२९.१.२००९ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त उभय घटकांत एकमत झाले नाही, त्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

जेजुरी येथील खंडोबा देवस्थानचे आपण वंशपरंपरागत पुजारी असून अनेक पिढ्यापासून तेथे राहत आहोत. या जागेवर श्री मार्तंड देव संस्थान समिती, जेजुरी या विश्वस्त संस्थेचा कोणताही अधिकार नाही. जेजुरी पोलीस ठाण्याच्या ही वरील समिती आपल्याला त्रास देत आहे. देवस्थानकडे जाण्यासाठी असलेल्या पायरी मार्गालगत आपल्या घराची बखळ आहे. देवस्थानच्या व्यवस्थापकांनी आपल्याविरुध्द जेजुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरुन पोलिसांनी आपल्यावर चॅप्टर केस दाखल केलेली आहे. तसेच नगरपरिषदेने पिण्याचे पाणी पाच वर्षे बंद ठेवले आहे. संपूर्ण पायरी मार्ग देवस्थानच्या मालकी वहिवाटीचा नसताना, तो असल्याचे तक्रारीत

म्हटले आहे. जेजुरी पोलीस ठाण्याने ज्या आधारे आपल्यावर आरोपपत्र ठेवले आहे, ते खोटे व बनावट स्वरुपाचे आहे, म्हणून ही तक्रार रद्द करावी, अशी मागणी श्री.लांघी यांनी अनेक निवेदनांद्वारे केली आहे. 'या संदर्भात योग्य मार्ग काढू,' असे अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक श्री.अशोक मोराळे यांनी अपिलाच्या सुनावणीच्या वेळी सांगितल्यामुळे तक्रार राहिली नसल्याचे आपण लिहून दिले, परंतु त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही. कोणतीही चौकशी न करता व आपल्याला बाजू मांडण्याची संधी न देता जेजुरी पोलीस ठाण्याने आपल्याला अटक केली, असे लेखी व तोंडी प्रतिपादन श्री.लांघी यांनी केले.

श्री.लांघी यांनी मागितलेली माहिती विहित मुदतीत त्यांना देण्यात आली आहे. मात्र त्यांची मुख्य मागणी माहितीची नसून प्रतिबंधक कारवाईबाबतची-चॅप्टर केस रद्द करण्याची आहे, असे आपण पूर्वीही त्यांना स्पष्ट केलेले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.रविंद्रसिंह परदेशी व अपिलीय प्राधिकारी श्री.अशोक मोहोळ यांनी आयोगापुढील सुनावणीत केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता, श्री.लांघी यांना माहिती देण्यात आली आहे, मात्र जागेच्या मालकी हक्काचा वाद, पोलिसांनी केलेली अटक व पोलिसांनी दाखल केलेली चॅप्टर केस मागे घेण्याची कार्यवाही हा श्री.लांघी यांचा अर्जातील व अपिलातील मुख्य विषय आहे. हा प्रशासकीय कार्यवाहीचा भाग असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

उभय बाजूंनी निवेदने व सादर केलेली कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे:

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४ .९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे १

श्री.धनंजय विठ्ठल बेदरे
द्वारा: श्री. राजेश साकनपराते,
प्लॉट नं. ८०/१८, दादू चौगुले नगर, कळंबा रोड, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद.कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी तथा** शिक्षणाधिकारी (माध्यमिक), — उत्तरवादी
शिक्षण विभाग. जिल्हा परिषद, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५३/ कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १६.९.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.धनंजय विठ्ठल बेदरे
द्वारा: श्री. राजेश सोनपराते,
प्लॉट नं. ८०/१८, दादू चौगुले नगर, कळंबा रोड, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी तथा** मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद.कोल्हापूर श्री.एन.एस.ननावरे

**जन माहिती अधिकारी तथा** शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
शिक्षण विभाग. जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री.डी.एस.पोवार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१०.११.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२२.१.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१४.२.२००७ |

## विवेचन

विविध शाळांमधील सेवकमान्यता पत्रांसह आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकाऱ्यांकडून मिळाली नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानंतरही अपूर्ण माहिती मिळाली, म्हणून अपीलकर्ता श्री.धनंजय विठ्ठल बेदरे, सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य आदिवासी कर्मचारी महासंघ, कोल्हापूर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि.१३.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी दिलेल्या माहितीबाबतच्या त्रुटी आपले प्रतिनिधी श्री.राजेश सोनपराते यांनी संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांच्या व अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणल्या होत्या. त्यानंतरही आपल्याला पूर्ण माहिती मिळालेली नाही. माहिती विलंबाने देण्यात आली. आदिवासी समाजासाठी शिक्षण संस्थांमध्ये आरक्षित असलेल्या रोस्टरप्रमाणे भरावयाच्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शेकडो जागा अन्य संवर्गातून भरल्याने या संवर्गावर शिक्षण खात्याने अन्याय केला आहे, म्हणूनच ही माहिती नष्ट केली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे दि.१७.१०.१९९७ चे सेवाभरतीबाबतचे आदेश डावलून केलेल्या या भरतीमुळे न्यायालयाचा अवमान झाला आहे, असे प्रतिपादन श्री.बेदरे यांनी लेखी व तोंडी केले.

श्री.बेदरे यांनी अनेक शाळांशी संबंधित माहिती मागितली होती. शाळा स्तरावरील ही माहिती असल्यामुळे व शाळांना स्वतंत्र जन माहिती अधिकारी असल्यामुळे त्यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी, असे श्री.बेदरे यांना विहित मुदतीत कळविण्यात आले होते, मात्र या उत्तराविरुध्द त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. संस्था स्तरावरील असली तरी जी माहिती शिक्षणाधिकारी कार्यालयात उपलब्ध होईल ती, माहितीचे विस्तृत स्वरुप लक्षात घेता, तीन महिन्यात पुरविण्यात यावी, असा आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला. त्यानुसार ५१४ पृष्ठांची माहिती संकलित करुन श्री.बेदरे यांना देण्यात आली. या माहितीचे विश्लेषण करुन त्यातील त्रुटी आपण नंतर निदर्शनास आणू असे श्री.बेदरे यांनी त्यावेळी सांगितले होते, अशा त्रुटी त्यांनी नंतर दर्शविलेल्या नाहीत, तसेच संबंधित शाळांकडेही त्यांनी माहितीची मागणी केली नाही, असे प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.एस.एस.गोसावी व अपिलीय प्राधिकाऱ्यांचे प्रतिनिधी श्री.एन.एस.ननावरे यांनी संबंधित कागदपत्रांसह नमूद केले. या त्रुटी दि.१३.५.२००८ रोजीच 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी आपल्या प्रतिनिधींनी जन माहिती अधिकाऱ्यांना दिल्या होत्या, असे श्री.बेदरे यांनी संबंधित पत्राच्या प्रतीसह नमूद केले.

श्री.बेदरे यांनी मागितलेली माहिती सन १९९९ पासूनची असून शिक्षण विभागाकडे संकलित स्वरुपात अशी माहिती उपलब्ध नसते, त्यामुळे संकलित करुन ती देण्यास विलंब लागला, तसेच उपलब्ध असलेली कोणतीही माहिती टाळलेली अथवा नाकारलेली नाही, असे श्री.गोसावी यांनी नमूद केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व निवेदने यांचा विचार करता श्री.बेदरे यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची व विविध शाळांशी संबंधित आहे. अनेक जन माहिती अधिकाऱ्यांकडील माहितीची मागणी असल्यास त्या त्या जन माहिती अधिकाऱ्यांकडेच माहिती मागितली पाहिजे, त्याचबरोबर संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यालयात उपलब्ध असणारी माहिती विहित मुदतीत दिली जाणेही आवश्यक आहे. जन माहिती अधिकाऱ्यांनी केलेला पत्रव्यवहार पाहता जाणीवपूर्वक माहिती टाळण्याचा प्रयत्न दिसत नाही. तसेच आणखीही कोणतीही माहिती हवी असल्यास देण्याची तयारी त्यांनी दर्शविलेली आहे. विस्तृत माहिती, त्यातील त्रुटी व पूर्तता यामध्ये प्रक्रिया लांबत जाते, त्याऐवजी अपीलकर्त्यास संबंधित अभिलेखांचे अवलोकन करु द्यावे व त्यातील आवश्यक असलेली माहिती द्यावी, अशी कार्यपध्दती अवलंबिली गेली पाहिजे.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य.

(२) अपीलकर्त्यास संबंधित अभिलेखांचे अवलोकन करु द्यावे व ५० पृष्ठांपर्यंतची माहिती नि:शुल्क द्यावी. त्यापेक्षा जास्त माहिती हवी असल्यास योग्य ते शुल्क आकारुन द्यावी. ही प्रक्रिया दि.२५.९.२००९ पर्यंत पूर्ण करुन जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री.एम.जी.चिखलीकर यांनी आयोगाला अनुपालन अहवाल सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १६.९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम , २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार करुन खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत:-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २५७६/ पुणे | श्री.बबन अप्पाजी बांगर कुकडी कॉलनी, मु.पो. नारायण-गाव, ता.जुन्नर, जि.पुणे | माहिती अधिकारी, बेल्हे ग्रामीण शासकीय रुग्णालय, मु.पो.बेल्हे, ता.जुन्नर, जि.पुणे | अपिलीय प्राधिकारी, बेल्हे ग्रामीण शासकीय रुग्णालय, मु.पो.बेल्हे, ता.जुन्नर, जि.पुणे | १) श्रीमती कल्पना मुकुंद बांगर, २) श्री. बळीराम अप्पाजी बांगर, ३) श्री.निलेश दत्तात्रय बांगर या व्यक्तींवर दि.०८.०७.२००७ दि.०५.०७.२००७ व दि.१०.०७.२००७ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र, बेल्हे येथे उपचार करण्यात आला. त्यांना कोणता आजार झाला होता ? या तीन व्यक्तींवर औषधोपचार करुन सर्टीफिकेट देण्याबाबत पोलीस अंमलदार, बेल्हे यांनी दिलेल्या पत्राची प्रत | १) जन माहिती अधिकारी यांनी दि.११.०६.२००८ व दि.२१.०६.२००८ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास माहिती दिलेली आहे. २) माहिती दिलेली असताना देखील आयोगाकडे अपील करण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | ३०७१/ पुणे | श्री.शिवाजी भिकोबा जाधव लक्ष्मीकृपा, प्लॉट नं.५३, पद्मदर्शन सोसायटी, पुणे-९ | शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय पुणे, जिल्हाधिकारी कचेरी आवार, पुणे -१ | उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग, जिल्हाधिकारी कचेरी आवार, पुणे -१ | महाराष्ट्र खाजगी वने (संपादित) अधिनियम,१९७५च्या कलम २२ नुसार पुनःस्थापित केलेल्या जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरील 'महाराष्ट्र शासन राखीव वने' हा शेरा कमी करुन मिळावा. | १) अपीलकर्त्याची मूळ मागणी ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. २) जन माहिती अधिकारी यांचे दि.०६.०३.२००९ रोजीच्या पत्रानुसार मागविलेल्या प्रस्ताव - विषयक मार्गदर्शनाबाबतच्या पुढील कार्यवाहीची माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडून प्राप्त करुन घेऊन जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसांत अपीलकर्त्यास कळवावी. |
| ३ | ६०८/ २००९/ पुणे | श्री.मंदार पद्माकर पूर्णपात्रे फ्लॅट नं.५, २०३२, सदाशिव पेठ, श्रीनिवास व्हेस्टा अपार्टमेंट, पुणे -३० | माहिती अधिकारी, उच्च शिक्षण विभाग, सेंट्रल बिल्डिंग, पुणे-१ | संचालक, उच्च शिक्षण विभाग, सेंट्रल बिल्डिंग, पुणे-१ | प्रा.डॉ.रावसाहेब कसबे यांच्या संदर्भातील तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक ॲन्टीकरप्शन ब्युरो, पुणे यांच्याकडून दि.१३.८.२००८ च्या सुमारास चौकशीसाठी सदर अर्ज आला होता का? त्यानुसार चौकशी अहवाल ॲन्टीकरप्शन ब्युरो, पुणे यांच्याकडे पाठविला का? अहवाल पाठविला नसल्यास विलंबाची कारणे काय? | मिळालेल्या माहितीने समाधान झाल्याने अपील निकाली काढण्याबाबत दि.१३.०२.२००९ रोजीच्या पत्रान्वये अपीलकर्त्याने आयोगास कळविले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ९८२/ २००९/ पुणे | श्री.विजयकुमार निवृत्ती चव्हाण ९/७१, फुलेनगर, आळंदी रोड, येरवडा, पुणे-६ | शिक्षण अधिकारी, शिक्षण मंडळ, पुणे महानगर-पालिका, कै.भाऊसाहेब शिरोळ भवन, जुना तोफखाना, शिवाजीनगर, धोबी घाट समोर, पुणे-५ | शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे महानगर-पालिका, कै.भाऊसाहेब शिरोळ भवन, जुना तोफखाना, शिवाजीनगर, धोबी घाट समोर, पुणे-५ | श्री.शरद महादेव चौरे, शिपाई, पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळ, पुणे यांच्या संबंधातील माहिती | अपीलकर्त्याने त्रयस्थ पक्षाची माहिती मागितलेली आहे. तसेच मागण्यात आलेली माहिती संदिग्ध स्वरुपाची आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. वरील तक्त्यातील एकूण ०४ अपिले अनुक्रमांक १ ते ४ (अपील क्र. २५७६/पुणे, ३०७१/पुणे, ६०८/२००९/पुणे व ९८२/२००९/पुणे) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र.३०७१/पुणे मध्ये निष्कर्षात नमूद / आदेशित केल्यानुसार कार्यवाही करुन अनुपालन अहवाल आयोगास विहित मुदतपूर्तीनंतर ८ दिवसांत आयोगास सादर करावा. अन्यथा संबंधित जन माहिती अधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये शास्ती व तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २२ -०९-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. सुधीर अच्युत भालेकर
रा. निरंका सोसायटी, प्लॉट नं.२६, सर्व्हे नं.१२३,
आयडियल कॉलनी, पौड रोड, कोथरूड, पुणे-३८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,
विकास योजना विभाग क्र. १
बांधकाम नियंत्रण, वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, घोले रोड, शिवाजीनगर, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता,
विकास योजना विभाग क्र. १, बांधकाम नियंत्रण,
वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका,
घोले रोड, शिवाजीनगर, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६०५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.८.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. सुधीर अच्युत भालेकर
रा. निरंका सोसायटी, प्लॉट नं.२६, सर्व्हे नं.१२३,
आयडियल कॉलनी, पौड रोड, कोथरूड, पुणे-३८

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,
विकास योजना विभाग क्र. १, बांधकाम नियंत्रण,
वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका,
घोले रोड, शिवाजीनगर, पुणे-५ श्री. विजय दहिभाते

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता,
विकास योजना विभाग क्र. १, बांधकाम नियंत्रण,
वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका,
घोले रोड, शिवाजीनगर, पुणे-५ श्री. रा. तु. शेळकेंदे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.१०.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१.१०.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.११.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सोबत छायांकित प्रत जोडली आहे. | |

## विवेचन

निरंका गृहनिर्माण संस्थेतील १९ सदनिका धारकांच्या /आऊट हाऊसच्या सन १९८५ पासून २० वर्षात झालेल्या बदलांची माहिती अपीलकर्ता श्री.सुधीर अच्युत भालेकर यांनी १९ रकाने असलेल्या विशिष्ट तक्त्यात मागितली होती. ती दिली जात नसल्याच्या कारणावरुन, श्री भालेकर यांनी अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, विकास योजना विभाग क्र.१, बांधकाम नियंत्रण, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडे अपील केले. महानगरपालिकेकडे ज्या स्वरुपात माहिती व कागदपत्रे आहेत त्याप्रमाणे देण्यात येतात, असे नमूद करुन ३० ते ४५ दिवसांत जागेची तपासणी करुन मान्य नकाशाव्यतिरिक्त अन्य बांधकाम असेल तर त्यावर नियमानुसार कारवाई सुरु करावी, असा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, विकास योजना विभाग क्र.१, बांधकाम नियंत्रण, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी दिला. अशी तपासणी होऊन करपात्र मूल्य ठरविण्याबाबतची माहिती आपल्याला मिळाली नाही. सर्वसाधारण माहिती देण्याऐवजी प्रत्येक सदनिकेचे मोजमाप देऊन माहिती देणे आवश्यक होते, ती दिली नाही, या कारणावरुन श्री. भालेराव यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि. १५.७.२००९ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

सन १९८५ सालचे अभिलेख उपलब्ध नसून तपासणीचे काम चालू असल्याने ती माहिती देण्यात आली नाही. मात्र बाकीची उपलब्ध माहिती मुदतीत देण्यात आली. सन १९८५ च्या कागदपत्रांचा शोध घेण्यात येत असून मागणी न केलेली (१९८४ मध्ये मान्य असलेल्या गॅझेटचे

भोगवटा पत्र) देण्यात आलेले नाही. मान्य नकाशावर फ्लॅटनुसार स्वतंत्र क्षेत्रफळ दर्शविण्यात येत नाही, असे श्री. भालेकर यांना स्पष्ट करुन सांगण्यात आले. एकत्रित करपात्र रक्कम दिलेली असून त्यांच्यासाठी वेगवेगळी करुनही देण्यात आली. प्रत्येक सदनिकेसाठी एफ.एस.आय. नसतो, मजल्यानुसार एफ.एस.आय. असतो, ती माहिती दिली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री. रा.तु.शेळकेंदे यांनी केले. करआकारणीबाबतची नियमानुसारची कार्यपध्दती अपिलीय प्राधिकाऱ्यांनी नमूद केली. यानुसार संपूर्ण माहिती श्री. भालेकर यांना देण्यात आली असल्याचे पूरक कागदपत्रांसह त्यांनी प्रतिपादन केले. आपण १९ सदनिकांची माहिती मागितली होती. प्रत्येक सदनिकेचे क्षेत्रफळ व नव्याने झालेले बांधकाम ही माहिती दिली जात नाही. नकाशावरुन ही माहिती कळत नाही. बांधकाम नियंत्रण विभागाकडून ही माहिती ठेवली गेली पाहिजे. वैयक्तिक सदनिकेची माहिती न ठेवणे म्हणजे नियंत्रण नसणे, असे दिसते. बेकायदेशीर बांधकाम झाले असल्यामुळे आपल्याला ही माहिती मिळावी, असे प्रतिपादन श्री. भालेकर यांनी केले. मान्यताप्राप्त आर्किटेक्टमार्फत एंफ.एस.आय. शिल्लक असल्याची खात्री करुन घेण्यास अपिलीय प्राधिकाऱ्यांनी आपल्यास सांगितले, हे महानगरपालिकेने करुन दिले पाहिजे, असाही दावा त्यांनी केला.

श्री. भालेकर यांनी निरंका गृहनिर्माण संस्थेतील सदनिकांची माहिती मागितली आहे. बेकायदेशीर बांधकामावर नियंत्रण असावे, ही त्यांची भूमिका रास्त आहे. मात्र शहरातल्या प्रत्येक सदनिकेची महानगरपालिकेच्या यंत्रणेने सातत्याने मोजणी करत राहणे, अशी अवाजवी अपेक्षा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत करता येणार नाही. तरीही निरंका सोसायटीबाबत अशी प्रसासकीय कार्यवाही करण्याचा आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलाच्या निर्णयात दिला आहे. बेकायदेशीर बांधकाम व करआकारणीविरुध्दची तक्रार महानगरपालिकेच्या नियमावलीनुसार स्वतंत्रपणे करणे आवश्यक आहे. तरीही प्रत्यक्ष जागेवर तपासणी करून सदनिकांच्या क्षेत्रफळाबाबतची माहिती आठ दिवसात त्यांना द्यावी, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. त्यानुसार संदर्भाधीन मिळकतीच्या करआकारणी बद्दल सन १९८५ मध्ये झालेल्या निर्णयाच्या प्रती व आयोगाने आदेश दिल्याच्या दिवशीच दि. १२.८.२००९ रोजी सदर मिळकतीमधील सदनिकांची तपासणी करुन जागेवर प्रत्यक्ष घेण्यात आलेल्या मोजमापांची माहिती

अपीलकर्त्यास देण्यात आल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित माहितीच्या प्रतीसह दि. १३.८.२००९ रोजी आयोगाला सादर केला.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २९.९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री. रफीक गफुर भोंबल
कृष्ण केवल नगर, को.ऑ.हौ.सोसा., बि.नं.३ नं.२२,
४ था मजला, युको बँके समोर,
कोंढवा रोड, पुणे - ४८ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** कोल्हापूर महानरगपालिका,
कोल्हापूर **उत्तरवादी**
**जन माहिती अधिकारी** तथा निबंधक (जन्म व मृत्यू)
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१५.०९.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. रफीक गफुर भोंबल<br>कृष्ण केवल नगर, को.ऑ.हौ.सोसा., बि.नं.३ नं.२२,<br>४ था मजला, युको बँके समोर, कोंढवा रोड, पुणे - ४८<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** निबंधक (जन्म व मृत्यू)<br>कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर डॉ. एस.एच.देशमुख | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०५.०१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२५.०१.२००७ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>दि.१४.०४.१९९० रोजीच्या जनन नोंदीमध्ये अनौरस संततीची नोंद केल्याच्या अनुषंगाने कायदेशीर माहिती मिळणेबाबत | |

**विवेचन**

जनन दाखल्यातील अनौरस संतती नोंदीच्या बाबतीतील माहिती आपल्याला दिली नाही व खोटी माहिती देणाऱ्या विरूध्द कायदेशीर कारवाई केली नाही अशी तक्रार अपीलकर्ता श्री. भोंबल यांनी केली आहे. अनौरस संततीच्या नोंदीच्या संदर्भातील माहितीसाठी उप संचालक, आरोग्य सेवा (आ.मा.जी.आ.) पुणे यांच्याकडे श्री.

भोंबल यांनी केलेला अर्ज, त्यांनी जन माहिती अधिकारी तथा निबंधक (जन्म व मृत्यू) कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांच्याकडे वर्ग केला. परंतु जन माहिती अधिकाऱ्यांनी कोणतीही माहिती दिली नाही म्हणून श्री. भोंबल यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि. १२.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या विशेष अपील निर्गत कार्यक्रमास अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी हे उपस्थित नव्हते, त्यामुळे सुनावणी ठेवण्यात आली.

एप्रिल १९९० मधील हा विषय असून आपल्याला योग्य ती माहिती दिली जात नाही. निबंधक (जन्म व मृत्यू) कोल्हापूर यांची फसवणूक करून व खोटे प्रतिज्ञापत्र लिहून जन्म नोंदीत दुरूस्ती केली आहे, अशी खोटी माहिती देणाऱ्यावर कारवाई करावी असे मुख्य निबंधक, जन्म व मृत्यू, महाराष्ट्र राज्य, तथा महासंचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांनी २००५ साली कळवूनही तशी कारवाई केलेली नाही, असे प्रतिपादन श्री. भोंबल यांनी केले.

श्री. भोंबल यांनी दि. २२.६.२००६, दि. ४.१२.२००६, दि. ६.१२.२००६, दि. ४.१४.२००७ अशा चार वेळा व त्यानंतरही वेळोवेळी माहिती मागितली, तेव्हा त्यांना ती मुदतीत दिली आहे. एकाही अर्जाबाबत त्यांनी प्रथम अपील केलेले नाही. अनौरस संतती नोंदीबाबत कायदेशीर बाबींची पूर्तत करून कार्यवाही केली आहे. प्रतिज्ञापत्राबाबतची कारवाई करता येत नसल्याचा अहवाल कायद्यानुसार दिला आहे, असे जन माहिती अधिकारी डॉ. एस.एस. देशमुख यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

प्रतिज्ञा पत्राबाबत कारवाई करावी, आदि मागण्या प्रशासकीय कार्यवाहीच्या असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंतर्गत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. १५.०९.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री. माणिक विश्वनाथ वाळेकर
ओतूर, ढमाळेमळा, ता.जुन्नर, जि.पुणे — **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अप्पर पोलीस अधीक्षक,
पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालय, पाषाण, पुणे-८ — **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** उप विभागीय पोलीस अधिकारी,
जुन्नर विभाग, ता.जुन्नर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१५.०९.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** श्री. माणिक विश्वनाथ वाळेकर ओतूर, ढमाळेमळा, ता.जुन्नर, जि.पुणे<br>**अपिलीय प्राधिकारी तथा** अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालय, पाषाण, पुणे-८ श्री.रामनाथ पोकळे<br>**जन माहिती अधिकारी** उप विभागीय पोलीस अधिकारी, जुन्नर विभाग, ता.जुन्नर, जि.पुणे श्री.अशोक शेजाळ | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०९.१०.२००६ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२६.१०.२००६ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१६.१२.२००६ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२९.१२.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -** पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण कार्यालयात दि.०९.०१.२००६ रोजी दिलेल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती व खुलासा, ओतुर पोलीस स्टेशनमध्ये नोंदविण्यात आलेल्या गुन्हा नं.४१/०४ मधील तपासाची सद्यस्थिती व तपास केव्हा पूर्ण करणार याबाबतचा खुलासा व प्रांताधिकारी श्री.गजानन पाटील यांचेविरुध्द खेड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद का करुन घेतली नाही इ.बाबतचा खुलासा. | |

# विवेचन

आपल्या अपहरणाच्या संदर्भातील फिर्यादीनुसार पोलिसांनी दि.२२.५.२००६ रोजी ओतूर येथे दवाखान्यात आपला जबाब घेतला. सर्व प्रमुख वर्तमानपत्रांमध्ये त्याची बातमी प्रसिध्द झाली. तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.मोहन जाधव यांनी त्याची माहिती दिल्याचे बातमीमध्ये म्हटले आहे. या जबाबाची प्रत वारंवार मागणी करुनही तीन वर्षे होत आली, तरीही आपल्याला दिली जात नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.माणिक विश्वनाथ वाळेकर यांनी केले. दि.१२.६.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी जबाबाची प्रत एक महिन्यात देण्याचे मान्य केले होते, परंतु आपल्याला अद्याप ती देण्यात आली नाही, असेही त्यांनी नमूद केले.

श्री.माणिक वाळेकर यांच्याविरुध्द फिर्याद देणाऱ्या श्रीमती राधाबाई लक्ष्मण चव्हाण कुटुंबिय यांच्यामध्ये जाण्यायेण्याच्या रस्त्यावरुन वाद असून विविध अधिकाऱ्यांकडे व न्यायालयात त्यांचे दिवाणी दावे चालू आहेत. श्री.वाळेकर यांच्याविरुध्दच्या फिर्यादीच्या अनुषंगाने तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.मोहन जाधव व त्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.मिसाळ यांनी तपास केला होता. श्री.वाळेकर यांच्या म्हणण्याप्रमाणे अपहरणाची घटना कल्याण येथे झालेली होती व आपण कल्याण येथे फिर्याद देऊ असे श्री.वाळेकर यांनी दि.२२.५.२००६ रोजी लिहून दिलेले आहे. त्यामुळे ओतूर येथे जबाब घेतलेला आहे का, याचा शोध घ्यावा लागेल, असे नव्याने रुजू झालेले जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, जुन्नर उपविभाग, जुन्नर श्री.अशोक शेजाळ व अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पुणे श्री.रामनाथ पोकळे यांनी नमूद केले.

पोलिसांनी जबाब घेतला नसेल तर तसे स्पष्ट कळविणे आवश्यक होते. दि.१२.६.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'नंतर तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री.अशोक मोराळे यांनी संबंधित माहिती अपीलकर्त्यास देण्याची सूचना उपविभागीय पोलीस अधिकारी, जुन्नर विभाग यांना दि.१३.६.२००८ रोजी दिली आहे. उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे लक्षात घेता ओतूर पोलिसांनी दि.२२.५.२००६ रोजी श्री.वाळेकर यांचा जबाब घेतला होता की नाही, हे तपासणे व जबाब घेतला नसल्यास तसे श्री.वाळेकर यांना कळविणे व घेतला असल्यास त्याची प्रत देणे आवश्यक होते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील अंशतः मान्य.

(२) अपीलकर्ता श्री.माणिक विश्वनाथ वाळेकर यांनी मागितलेल्या त्यांच्या दि.२२.५.२००६ च्या जबाबाबाबतचा वस्तुस्थितीदर्शक स्पष्ट अहवाल जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, जुन्नर उपविभाग, जुन्नर श्री.अशोक शेजाळ व अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पुणे श्री.रामनाथ पोकळे यांनी दि.२३.९.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा. त्याची प्रत अपीलकर्त्यास द्यावी.

**पुणे**
**दि १५.०९.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. विवेक हरी पेंडसे
१, योगेश्वरी अपार्टमेंट, नेमिनाथनगर, सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व
मुद्रांक उप नियंत्रक, पुणे विभाग, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सह जिल्हा निबंधक
वर्ग-१, सांगली, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६३ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | २९.८.२००८ |

**३ उपस्थित -** श्री. विवेक हरी पेंडसे
१, योगेश्वरी अपार्टमेंट, नेमिनाथनगर, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व
मुद्रांक उप नियंत्रक, पुणे विभाग, पुणे **श्री. व.मा. मसके**

**जन माहिती अधिकारी** तथा सह जिल्हा निबंधक
वर्ग-१, सांगली, जि. सांगली श्री. व्ही. डी. धनशेट्टी

**<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**

सप्टेंबर ते ऑक्टोबर २००३ या कालावधीतील प्रवास खर्चाची देयके तत्कालीन अधिकाऱ्यांनी मंजूर करून स्वाक्षांकित केलेली असूनही ती का आदा करण्यात आली नाहीत. सदर विलंबाकरिता / दिरंगाईस कोण जबाबदार आहे, दिरंगाईबाबत संबंधितांवर महाराष्ट्र नागरी सेवा नियमातांर्गत कोणती कारवाई करण्यात आली आहे, नसल्यास का करण्यात आलेली नाही, याबाबतची माहिती

## विवेचन

फिरती दौऱ्याची देयके मंजूर असूनही देण्यात आली नाहीत. जन माहिती अधिकाऱ्यांनी त्याबाबतची माहितीही दिली नाही. माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी देऊनही त्याचे पालन करण्यात आले नाही. देयक प्रलंबित असतानाही प्रलंबित नसल्याचे उत्तर दिले व प्रलंबित असण्यास जबाबदार कोण? याची माहिती दिली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. विवेक हरी पेंडसे यांनी केले.

श्री. पेंडसे यांनी दौऱ्यावर जाण्यापूर्वी दौऱ्याची देयके वरिष्ठांकडून मंजूर करणे आवश्यक होते. देयकांची मागणी त्यांनी दोन वर्षांनंतर केली. त्याबाबतचा संपूर्ण तपशील त्यांना कळविण्यात आला, असे जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग-१ श्री. व्ही. डी. धनशेट्टी यांनी नमूद केले. श्री. पेंडसे यांनी दौरा देयके विनापरवाना घेतली आहेत. तरीही त्याबाबत कार्यवाही केली आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उप नियंत्रक, पुणे विभाग, श्री. व. मा. मसके यांनी केले.

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे, असे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागद-पत्रांवरुन दिसते. देयकांस झालेल्या विलंबाबतच्या स्पष्टीकरणाचे पत्र अपीलकर्त्यास तीन दिवसांत द्यावे असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिलं. त्यानुसार मुद्देनिहाय स्पष्टीकरणात्मक पत्र जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग-१ सांगली यांनी दि.३०.८.२००८ रोजी श्री. पेंडसे यांना दिल्याचे आयोगास अवगत केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३०.०९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सिध्दार्थ भगवान बनसोडे
मु.पो.पिंपळी, ता.बारामती, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा व्यवस्थापक, बारामती सहकारी बँक मर्यादित,
भिगवण चौक, ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६६५ / पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२५.२.२००९ (वि.अ.नि.का.) |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सिध्दार्थ भगवान बनसोडे
मु.पो.पिंपळी, ता.बारामती, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री.सुनिल के.देशमुख

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.१२.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.११.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.११.२००८ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** |
|---|---|
| | बँकेचे कंत्राटदार यांना परवाना कोणत्या साली मिळाला. सन २००१ व २००२ या वर्षी सौ.उज्वला चंद्रकांत सुडगे व सौ.पुष्पलता दत्तात्रय लांडगे कंत्राटी सफाई कामगार होते, कंत्राटदाराचे नाव, बँकेने त्यांचे हजेरीपत्रक कसे तयार केले, त्यांची सेवा सलग २४० दिवस पूर्ण झाली किंवा नाही, आश्वासन दिल्याप्रमाणे त्यांना कामावर का घेण्यात आले नाही. |

## विवेचन

बारामती सहकारी बँक लि. ,बारामती यांच्याकडून कामगारांविषयी मागितलेली माहिती सहकारी बँकेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्याच्या कारणावरुन नाकारण्यात आली. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलाची दखल घेतली नाही, म्हणून अपीलकर्ता श्री.सिध्दार्थ भगवान बनसोडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. नागरी सहकारी बँका व पतपेढ्या यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही,असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचिका क्र.५२९४/२००८ दि.२८ एप्रिल २००९ मध्ये दिला आहे. तो लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३०.०९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. शिवाजी हंबीरराव एकाड
रा. सरडेवाडी, ता. इंदापूर, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्यादित,
विभाग कार्यालय बारामती, जि. पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्यादित,
विभाग कार्यालय बारामती, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६६७/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्यादित,
विभाग कार्यालय बारामती, जि. पुणे श्री. परशुराम गोपीनाथ घनवट

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्यादित,
विभाग कार्यालय बारामती, जि. पुणे श्री. दत्तात्रय रामचंद्र बालगुडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.७.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ६.१२.२००८ |

| | |
|---|---|
| ८ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br>सोबत छायांकित प्रत जोडली आहे. |

## विवेचन

कृषि पंपासाठी नवीन वीज पुरवठ्याची मागणी करणारा अर्ज आधी नामंजूर झाला व नंतर मजूंर होऊन आला, या संदर्भात आपल्याला दिलेली माहितीची प्रत दिशाभूल करणारी व बनावट असल्याचा आपला कयास आहे, असे नमूद करुन, त्याबाबतची सत्य माहिती आपल्याला मिळावी, अशा मागणीसाठी अपीलकर्ता श्री. शिवाजी हंबीरराव एकाड यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

बनावट कागदपत्रांबाबत संपूर्ण चौकशीचा अहवाल व माहिती दि.९.११.२००८ पर्यंत देण्यात येईल, असा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, विद्युत वितरण कंपनी मर्यादित, बारामती श्री. परशुराम गोनीनाथ घनवट यांनी घेतलेल्या सुनावणीत दि.२४.१०.२००८ रोजी देण्यात आला. परंतु तशी माहिती देण्याऐवजी आपल्यावर दबाव आणून दहशतीचे वातावरण करुन जबरदस्तीने आपल्याकडून, ‘मिळालेल्या माहितीने समाधान झाले असून माहितीची आवश्यकता नसल्याचे’ लिहून देण्यास भाग पाडले, असे श्री. एकाड यांनी अपील अर्जात नमूद केले आहे.

दि. २४.२.२००९ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या ‘विशेष अपील निर्गत कार्यक्रमा’त या अपिलाचा समावेश होता. परंतु त्या दिवशी अपीलकर्त्यास पोलिसांनी अटक केल्याचे त्यांचे चिरंजीव श्री. सचिन एकाड यांनी आयोगाला कळविले व मानवी हक्कांचे उल्लंघन करुन आपल्या जीविताला धोका निर्माण केला जात आहे, असे लेखी निवेदन अपीलकर्ता श्री. शिवाजी हंबीरराव एकाड यांनी दि.२४.२.२००९ व पुन्हा दि.२३.३.२००९ रोजी आयोगाला सादर केले. दि. २४.२.२००९ च्या निवेदनाच्या त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, यांच्याकडून व दि.२३.३.२००९ च्या तक्रारीच्या अनुषंगाने श्री. परशुराम गोपीनाथ घनवट, श्री. दयासिंग शंकरराव मोहिते, श्री. दत्तात्रय रामचंद्र बालगुडे व श्री. अरुण चव्हाण यांच्याकडून आयोगाने खुलासा मागविला. श्री. एकाड यांना वेळोवेळी मागितलेली माहिती व कागदपत्रांच्या प्रती देण्यात आल्या.

कागदपत्रांमध्ये अनधिकृतपणे फेरफार करुन त्यांनीच कृषिपंपाला वीज पुरवठा मिळवून घेतला. त्यांच्यावर दबाव आणला यात तथ्य नाही, याउलट जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या., इंदापूर श्री. दत्तात्रय रामचंद्र बालगुडे यांना धमकी देऊन त्यांनीच पैशाची मागणी सुरु केल्यावर श्री. बालगुडे यांनी त्यांच्याविरुध्द खंडणीचा गुन्हा इंदापूर पोलीस ठाण्यात दाखल केला. त्यात त्यांना अटक होऊन जामीन मिळून इंदापूरच्या न्यायालयात प्रकरण दाखल आहे. श्री. एकाड कर्मचाऱ्यांविरुध्द खोटे नाटे अर्ज करुन त्यांच्यावर खोटे दावे करुन मानसिक दबाव आणतात. याबाबत कोणत्याही यंत्रणेमार्फत चौकशी व्हावी, असे श्री. परशुराम गोपीनाथ घनवट, श्री. दयासिंग शंकरराव मोहिते, श्री. दत्तात्रय रामचंद्र बालगुडे, श्री. अरुण चव्हाण या अधिका-यांनी लेखी निवेदनात अनुषंगिक कागदपत्रांसह नमूद केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता अ) अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. ब) बनावट कागदपत्रे केल्याचा व दबाव आणण्याचा आरोप उभय बाजूंनी परस्परांवर केला आहे, असे दिसते. त्याबाबत पोलिसांकडे तक्रार दाखल असून प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे.

मानवी हक्काचे उल्लंघन झाल्याची श्री. एकाड यांची तक्रार आहे, तर शांतपणे तणावमुक्त जगण्याच्या आपल्या मुलभूत मानवी हक्कावर श्री. एकाड अतिक्रमण करीत आहेत, अशी अधिका-यांची तक्रार आहे. मात्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत याचा निर्णय येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात आले आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३०.९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. शांताराम गोपाळ देशमाने
रा. पेठ, ता. वाळवा, जि.सांगली **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कं.लि., वाळवा, जि.सांगली **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कं.लि., वाळवा, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६८ /सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | ३०.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. शांताराम गोपाळ देशमाने
रा. पेठ, ता. वाळवा, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कं.लि., वाळवा, जि.सांगली
श्री. डी. आर. सोवनी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कं.लि., वाळवा, जि.सांगली
श्री. एस.व्ही. बेडगकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.८.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.११.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.४.२००७ |

| | |
|---|---|
| ९ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** |
| | सोबत प्रत जोडली आहे. |

आपण मागितलेली माहिती एक वर्षानंतर व तीही अपुरी मिळाली. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी वेगवेगळी माहिती दिली. अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती कोणत्या कारणासाठी हवी आहे, अशी कायद्यात तरतूद नसताना विचारणा केली, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. शांताराम गोपाळ देशमाने यांनी केले.

श्री. देशमाने यांनी १४ मुद्दयांची माहिती मागितली असून त्यात अनेक बाबी सूचनावजा आहेत. उदा. वीज बिलाबाबत मागे दिलेल्या तपशीलामध्ये सुधारणा करावी, सर्व सामान्य ग्राहकाला समजण्याच्या दृष्टीने वीजबिले मराठीत द्यावीत, वीजमीटर बंद असेल व त्याबाबत ग्राहकाची तक्रार नसताना मीटर बदलले जाते व त्याची रक्कम ग्राहकाकडून वसूल केली जाते, हे अन्यायकारक नाही का? अशा स्वरुपाचे मुद्दे असूनही त्यांना माहिती देण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकाऱ्यांनी केले.

श्री. देशमाने यांनी माहिती मागणीच्या अर्जात व अन्य पत्रव्यवहारातही अनेक सूचना केल्या असून विस्तृत भाष्यही केले आहे. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३० .९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. नारायण बाबुराव सुतार
१००५/३,राजेंद्रनगर, शिवगौरी सोसायटी, पुणे-३० — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,
(भूसंपादन व व्यवस्थापन),
पुणे महानगरपालिका, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता
(भूमी जिंदगी), पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६८१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.८.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. नारायण बाबुराव सुतार
१००५/३,राजेंद्रनगर, शिवगौरी सोसायटी, पुणे-३०

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,
(भूसंपादन व व्यवस्थापन), पुणे महानगरपालिका, पुणे
श्री. सुधाकर तेलंग
**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता
(भूमी जिंदगी), पुणे महानगरपालिका, पुणे श्री. चंद्रशेखर हंसलाल अकवारे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.१०.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.११.२००८ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सोबत छायांकित प्रत जोडली आहे.

## विवेचन

मौजे गुलटेकडी व पर्वती, पुणे येथील एका जागेतील दर्गा व दर्ग्याची शेड याबाबतच्या कागदपत्रांच्या प्रती न मिळाल्याच्या कारणावरुन अपीलकर्ता श्री. नारायण बाबुराव सुतार यांनी

राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

संपूर्ण प्रकरणाच्या संचिका पाहण्यासाठी द्याव्यात व मागणी केलेल्या कागदपत्रांच्या प्रती उपलब्ध करुन द्याव्यात, असा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, (भूसंपादन व व्यवस्थापन ), पुणे महानगरपालिका, पुणे यांनी दिला होता. परंतु आपण नेमकी माहितीची मागणी केली असल्यामुळे ती कागदपत्रे मिळणे आवश्यक आहे. परंतु ती उपलब्ध नसल्याचे सांगितले जाते, असे निवेदन श्री. सुतार यांनी केले. कागदपत्र देण्याबद्दल नगरविकास कार्यालयाला आपल्या विभागाने लिहिले होते, परंतु या प्रकरणात कागदपत्र उपलब्ध नसल्याचे त्यांनी कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी यांनी केले. अभिलेखांच्या वर्गवारीनुसार या कागदपत्रांच्या जतनाच्या कालावधीची विचारणा आयोगाने केली . दि.३.११.१९८७ रोजीची ही कागदपत्रे असून हे कायम स्वरुपी जतनाचे अभिलेख आहे, असे जन माहिती अधिकारी श्री. अकवारे यांनी सांगितले. हे लक्षात घेता संबंधित कागदपत्रांचा १५ दिवसांत कसून शोध घ्यावा व अपीलकर्त्यास त्याच्या प्रती दयाव्यात. कागदपत्र उपलब्ध न झाल्यास त्याच्या जतनाची जबाबदारी असणा-या संबंधित कर्मचाऱ्यांविरुध्द फौजदारी गुन्हा नोंदवावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्री. सुतार यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती दि.१४.८.२००९ व दि.२०.८.२००९ रोजी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत, असे संबंधित कागदपत्रांच्या प्रतींसह व अपील निकाली काढण्याबाबतच्या अपीलकर्त्याच्या निवेदनासह जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.१०.९.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २५ .९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. शशिकांत भिमाजी कुलकर्णी
विद्यानगर, दूर संचार कार्यालयाजवळ, **अपीलकर्ता**
ता. जत, जि. सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक,
राज्य उत्पादन शुल्क, सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा दुय्यम निरीक्षक,
राज्य उत्पादन शुल्क, ता. जत, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६९ /सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | ३०.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक,
राज्य उत्पादन शुल्क, सांगली श्री. मो.सु. वर्दे

**जन माहिती अधिकारी** तथा दुय्यम निरीक्षक,
राज्य उत्पादन शुल्क, ता. जत, जि. सांगली श्री. प्र.म.निंबाळकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.१२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८.१.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.३.२००७ |

**८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**
सोबत प्रत जोडली आहे.

## विवेचन

अपीलकर्ता श्री. शशिकांत भिमाजी कुलकर्णी यांनी दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, जत, हे जन माहिती अधिकारी नसताना त्यांच्याकडे माहितीची मागणी करणारा अर्ज केला. श्री. कुलकर्णी यांना माहिती दिली. ती अपुरी असल्याच्या कारणावरुन श्री. कुलकर्णी यांनी अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क सांगली, यांच्याकडे अपील केले. सुनावणीच्या तीन तारखा देऊनही ते उपस्थित न राहिल्यामुळे अपील तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री. सं. सि. शिंदे यांनी ते निकाली काढले, असे लेखी व तोंडी निवेदन विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सांगली श्री. मो.सू. वर्दे यांनी केले. आयोगाकडील सुनावणीलाही श्री. कुलकर्णी उपस्थित नव्हते. तसेच कोणती माहिती अपुरी आहे, याचा तपशील त्यांनी दिलेला नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २५.९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दिनकर सदाशिव कांबळे
४०, वानवडी गाव, पुणे-४११०४० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (जिंघ),
सेवकवर्ग विभाग अधिकारी यांचे कार्यालय, पुणे महानगरपालिका उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालय अधीक्षक,
सेवकवर्ग विभाग अधिकारी यांचे कार्यालय, पुणे महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७००+२७०१+२७०२+२९७५ /पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिनकर सदाशिव कांबळे
४०, वानवडी गाव, पुणे-४११०४०

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (जिंघ),
सेवकवर्ग विभाग अधिकारी यांचे कार्यालय, पुणे महानगरपालिका श्री.के.सी.कारकर

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालय अधीक्षक,
सेवकवर्ग विभाग अधिकारी यांचे कार्यालय, पुणे महानगरपालिका श्री.शिवाजी दौंडकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२.९.२००८, दि.१८.१०.२००८, दि.१०.९.२००८, दि.१.१२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३.१०.२००८, दि.२४.११.२००८, दि.१३.१०.२००८, दि.३०.१२.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.१०.२००८,दि.१.१२.२००८, दि.२०.१०.२००८, दि.७.१.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १.१२.२००८, दि.६.१२.२००८, दि.१.१२.२००८, दि.६.२.२००९ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.दिनकर सदाशिव कांबळे यांनी पुणे महानगरपालिकेमधील अधिकारी श्री.आशिष महाडदळकर यांच्या संदर्भातील विविध स्वरुपाची माहिती चार अर्जांद्वारे महानगरपालिकेचे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. श्री.महाडदळकर पुणे महानगरपालिकेत रुजू होण्यापूर्वी ग्रामपंचायत, धनकवडी येथे सेवेत होते. आपण पुणे जिल्हा परिषदेमध्ये कामाला होतो व तेथे उपलेखापाल या पदावर बढती मिळाली, असे श्री.महाडदळकर यांनी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे. परंतु जिल्हा परिषदेत ते कधीही कामाला नव्हते, अशी माहिती जिल्हा परिषदेकडून मिळालेली आहे. सन १९८१ पासून श्री.महाडदळकर धनकवडी ग्रामपंचायतीत कामाला होते व हा विभाग पुणे महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ट झाल्यानंतर त्यांना महानगपालिकेच्या सेवेमध्ये समाविष्ट करण्यात आले. या संदर्भातील माहिती आपण मागितली असता सेवकवर्ग विभागात जन माहिती अधिकारी असलेले श्री.महाडदळकर यांनीच ही माहिती सेवकवर्ग विभागाकडे उपलब्ध नसल्याचे कळविले. उपलब्ध माहिती श्री.कांबळे यांना द्यावी व ज्या मुद्दयांची माहिती उपलब्ध नसल्याचे कळविले आहे त्याबाबतचे स्पष्टीकरणात्मक उत्तर द्यावे. ग्रामपंचायतीकडून महापालिकेत वर्ग झालेल्या कागदपत्रांच्या व श्री.महाडदळकर यांच्या सेवापुस्तकातील नोंदीच्या प्रती त्यांना उपलब्ध करुन

द्याव्यात, असा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त (जिंघ), सेवकवर्ग विभाग अधिकारी यांचे कार्यालय यांनी देऊनही श्री.महाडदळकर यांनी आपल्याला कोणतीही माहिती दिली नाही, म्हणून त्यांच्यावर कारवाई व्हावी व आपल्याला पूर्ण माहिती मिळावी, यासाठी श्री.कांबळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे चार अपिले केली आहेत.

श्री.महाडदळकर यांच्या सेवेसंबंधीची वैयक्तिक माहिती आपण मागितली आहे, ती अभिलेखात उपलब्ध नाही, असे स्वत: श्री.महाडदळकर हेच कळवितात, हे योग्य नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी आदेश देऊनही त्यांनी माहिती दिली नाही, उच्च न्यायालयाची व महानगरपालिकेची त्यांनी फसवणूक केली असून ती उघडकीला येऊ नये म्हणून माहिती नाकारली जात आहे, असे प्रतिपादन श्री.कांबळे यांनी केले.

श्री.महाडदळकर यांच्या संदर्भातील माहिती श्री.कांबळे विविध अर्जांद्वारे सातत्याने मागत असून विविध पातळ्यांवर त्याबाबत त्यानी तक्रारीही केलेल्या आहेत. श्री.महाडदळकर यांच्याप्रमाणेच आपली सेवा असून त्यांनी केलेल्या खोट्या कागदपत्रांमुळे पदोन्नतीबाबतचा आपला न्याय्य हक्क डावलला गेल्याचे श्री.कांबळे यांचे म्हणणे आहे.

श्री.कांबळे सातत्याने या स्वरुपाचे अर्ज करीत आले असून ग्रामपंचायत कार्यवृत्तांत पुस्तिका आदी कागदपत्रे ११ वर्षांपूर्वीपासून अभिलेख विभागाकडे पाठविण्यात आली आहेत. त्यांच्या अर्जानंतर सेवपुस्तकातील उपलब्ध नोंदींच्या प्रती त्या त्या वेळी देण्यात आल्या. सेवकवर्ग विभागाकडे अन्य कागदपत्रांचा शोध घेण्यात आला, परंतु ती उपलब्ध न झाल्याने त्यांना देण्यात आली नाहीत. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दि.६.१२.२००७, दि.७.११.२००८, दि.२.२.२००९ या तारखांना अपिलांचे निर्णय दिले. दरम्यान दि.६.१.२००९ ते २४.३.२००९ या काळात आपण रजेवर होतो. त्यामुळे माहिती देता आली नाही. धनकवडी ग्रामपंचायतीकडील पगारपत्रके आदी कागदपत्रे देण्याबाबत अपिलीय प्राधिकाऱ्यानी दि.२६.३.२००९ व दि.७.५.२००९ च्या पत्रान्वये कळविले होते, परंतु दरम्यानच्या काळात दि.९.३.२००९ रोजी सेवकवर्ग विभाग कार्यालयाकडून आपली बदली आयातकर कार्यालयाकडे झाली. त्यामुळे संबंधित कागदपत्रांचा शोध आपण घेऊ शकत

नसल्याचे कळविले. पुणे महानगरपालिकेच्या नानावाडा येथल अभिलेखामध्ये हे कागदपत्र शोधण्यास आपल्याला परवानगी मिळावी, अशी विनंती आपण दि.१५.४.२९ व दि.३१.७.२००९ च्या पत्रान्वये अपिलीय प्राधिकाऱ्यांना केली होती. माहिती लपविण्याचा आपला प्रयत्न नाही, असे प्रतिपादन श्री.महाडदळकर यांनी लेखी व तोंडी केले. सोबत संबंधित पत्रव्यवहाराच्या प्रती त्यांनी सादर केल्या.

श्री.कांबळे यांनी श्री.महाडदळकर यांच्यावर महानगरपालिकेच्या आर्थिक फसवणुकीसह विविध स्वरुपाचे आरोप केले आहेत. या आरोपांच्या व कागदपत्रांच्या अनुषंगाने आपण चौकशी केली. महानगरपालिकेकडे वर्ग झालेल्या कागदपत्रांची आवक बारनिशीला व कार्यविवरणपत्रात नोंद आहे. सोबतचे कागदपत्र मिळालेले नाहीत, असे पत्र त्यांनी त्यावेळी दिलेले नाही. केवळ पत्र मिळाले असे कायदेशिररीत्या त्यांना म्हणता येणार नाही. अभिलेखागारात कागदपत्रे पाठविल्याचे फेरिस्त नाही. याचा अर्थ त्यांनी ते गहाळ केलेले आहेत, असे सिध्द होते, असा अहवाल आपण केलेल्या चौकशीनंतर आपण महानगरपालिका आयुक्तांना सादर केला आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, सेवकवर्ग (जिंघ), सेवकवर्ग विभाग अधिकारी यांचे कार्यालय श्री.के.सी.कारकर यांनी विस्ताराने नमूद केले.

सुनावणीच्या वेळी आयोगाने खालीप्रमाणे मौखिक आदेश दिले :

(१) श्री.महाडदळकर यांच्या विरुध्दच्या तक्रारीच्या अनुषंगाने उपायुक्त (सेवकवर्ग), पुणे महानगरपालिका श्री.के.सी.कारकर यांनी महानगरपालिका आयुक्तांना सादर केलेल्या चौकशी अहवालाची प्रत पाच दिवसात अपीलकर्त्यास नि:शुल्क द्यावी.

(२) श्री.कांबळे यांचा अर्ज व त्यावर केलेली कार्यवाही याबाबतचा तपशीलवार अहवाल तत्कालीन जन माहिती अधिकारी म्हणून श्री.महाडदळकर यांनी एका आठवड्यात सादर करावा.

(३) धनकवडी ग्रामपंचायतीने पुणे महानगरपालिकेकडे सुपूर्त केलेल्या कार्यवृत्तांत पुस्तिका, नमुना-२४ बारनिशी आदी कागदपत्रांचा शोध घेऊन दहा दिवसात विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, सेवकवर्ग विभाग अधिकारी यांचे कार्यालय श्री.शिवाजी दौंडकर यांनी अपीलकर्त्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती द्याव्यात.

(४) वरील कागदपत्रे मिळत नसल्यास व ती गहाळ करण्यास श्री.महाडदळकर जबाबदार असल्याचे आढळल्यास त्याबाबत ते व अन्य संबंधित यांच्याविरुध्द महाराष्ट्र अभिलेख अधिनियम, २००५ अन्वये फौजदारी गुन्हा दाखल करावा.

जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, सेवकवर्ग विभाग अधिकारी यांचे कार्यालय श्री.शिवाजी दौंडकर यांनी आयोगाला वरील आदेशानुसार दि.२०.८.२००९ रोजी अहवाल सादर केला. श्री.महाडदळकर यांनी जन माहिती अधिकारी म्हणून त्यावेळी कार्यवाही करणे आवश्यक होते. त्यांच्याविरुध्दच्या तक्रारीबाबत श्री.कारकर यांनी केलेल्या चौकशीच्या अहवालाची प्रत दि.२०.८.२००९ रोजी श्री.कांबळे यांना पाठविण्यात आली असून नानावाडा येथील अभिलेखात संबंधित कागदपत्रांचा शोध घेण्यासाठी श्री.महाडदळकर यांनी विनंती केल्यानुसार त्यांना परवानगी देण्यात आली आहे. हा शोध घेतल्यानंतर स्वतंत्रपणे अहवाल सादर करण्यात येईल, असे श्री.दौंडकर यांनी अहवालात नमूद केले आहे.

'संबंधित कागदपत्र शोधण्याकामी आपल्याला दि.२०.८.२००९ रोजी परवानगी देण्यात आली. दि.२१.८.२००९ पासून आपण शोध घेतल्यानंतर दि.२७.८.२००९ रोजी नानावाडा येथील अभिलेखागारात आपल्याला वरील सर्व कागदपत्रे उपलब्ध झाली आहेत. 'सदरचे उपलब्ध झालेले रेकॉर्ड श्री.धनंजय गोखले, जनरल रेकॉर्डरुम प्रमुख यांनी श्री.सदानंद शिंपी, ज्युनिअर ग्रेड लेखनिक, सेवकवर्ग विभाग, पुणे महानगरपालिका यांचे ताब्यात दि.२८.८.२००९ रोजी दिलेले आहे,' असे श्री.महाडदळकर यांनी श्री.गोखले व श्री.शिंपी यांच्या पोहोचपत्राच्या प्रतीसह दि.३१.८.२००९ च्या अहवालात नमूद केले आहे.

महानगरपालिकेची आर्थिक व अन्य स्वरुपाची फसवणूक श्री.महाडदळकर यांनी केली की नाही, याचा निर्णय करणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही.

वरील बाबी लक्षात घेता श्री.कांबळे यांनी मागितलेली माहिती सन १९९७ पासूनची (त्यावेळी सुमारे ११ वर्षांपूर्वीची)आहे. जन माहिती अधिकारी म्हणून श्री.महाडदळकर यांनी सेवकवर्ग विभागाकडे संबंधित कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे कळविण्यापलीकडे कार्यवाही केलेली

दिसत नाही. श्री.कांबळे यांच्या अर्जांचा कालावधी लक्षात घेतला तरी प्रथम अपिलाच्या निर्णयानंतर त्याच वेळी अभिलेखागारातील कागदपत्रांचा शोध ते घेऊ शकले असते, त्याच विभागात अधिकारी असताना तो त्यांनी घेतलेला नाही, हे अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयाची तारीख व श्री.महाडदळकर यांच्या रजेचा कालावधी लक्षात घेता स्पष्ट होते. श्री.महाडदळकर यांनी श्री.कांबळे यांच्या अर्जांना विहित मुदतीत उत्तर दिले असले तरी, अन्य विभागातील बदलीनंतर त्यांनी मागितलेल्या परवानगीनंतर शोध घेतल्यावर संबंधित कागदपत्रे त्याना उपलब्ध झाली आहेत, हे या संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहे म्हणूनच, कागदपत्रे त्यांनी गहाळ केली, असे दिसत नाही. मात्र श्री.महाडदळकर यांनी श्री.कांबळे यांना माहिती देण्याबाबत निष्काळजीपणा व टाळाटाळ केल्याचे सिध्द होते जाणीवपूर्वक अपूर्ण माहिती देण्याचे व पर्यायाने माहिती नाकारण्याचे हे कृत्य असून त्याबद्दल ते शास्तीस पात्र ठरतात.

## आदेश

(१) चारही अपिलांमधील मागणी मान्य करण्यात येत आहे.

(२) तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.आशिष महाडदळकर यांनी माहिती देण्यात तत्परता न दर्शविता माहिती अपूर्ण दिली व पर्यायाने नाकारली, याबद्दल त्यांना रुपये १०,००० शास्ती चारही अपिलांमधील कालावधी लक्षात घेऊन लावण्यात येत आहे. या अधिकाऱ्यांकडून ही शास्ती त्यांना नोव्हेंबर २००९ मध्ये मिळणाऱ्या ऑक्टोबर महिन्यातील पगारातून वसूल करुन ती '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही श्री.के.सी.कारकर, उपायुक्त (सेवकवर्ग), पुणे महानगरपालिका यांनी करुन तसेच याबाबत संबंधितांच्या सेवापुस्तकात व गापेनीय अहवालात याच्या नोंदी घेऊन त्याचा अहवाल आयोगाला सादर करण्याची दक्षता घ्यावी.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२५.०९.२००९